Vol 6 Issue 12 June 2017

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


### Regional Editor

Dr. T. Manichander

### *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

### *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 IMPACT FACTOR : 4.6052(UIF)

GRT GOLDEN RESEARCH THOUGHTS

VOLUME - 6 | ISSUE - 12 | JUNE - 2017

# 'स्वतंत्र विदर्भ' राज्याचे कट्टर पुरस्कर्ते – टी.जी. देशमुख

कु. रेशमा तु. निमजे



## प्रस्तावना :

त्रिंबक गोपाळराव देशमुख उपाख्य टी.जी. देशमुख हे 'स्वतंत्र विदर्भ' आंदोलनासाठी तसेच झुंजार पत्रकारीतेसाठी आणि घणघणाती वक्तृत्वासाठी ओळखले जात होते. त्यांची राजकारण, समाजकारण आणि शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरी उल्लेखनीय आहे. एक चांगले साहित्यिक, एक चांगले वक्ते, एक चांगले लेखक आणि त्याहीपेक्षा एक चांगली दृष्टी त्यांना लाभलेली होती. एकही क्षेत्र वर्जित नसणारे, सर्व क्षेत्रात प्राविण्य मिळविणारे असे आगळेवेगळे व्यक्तिमत्व टी.जी. देशमुख साहेबांना प्राप्त झालेहोते.

अशा या विदर्भवादी कर्तबगार नेत्याचा जन्म 12 ऑगस्ट 1923 मध्ये विदर्भातील विडूळ या गावात, तालुका उमरखेड, जि. यवतमाळ येथे झाला. त्यांना आमदार, खासदार, मंत्री, महापौर असे मानसन्मान प्राप्त झालेले आहेत. 'मराठीजग,' 'विदर्भ आंदोलन', 'जयविदर्भ' मातृभूमी इ. वृत्तपत्रांचे टी.जी. संपादक होते.[1]

1953–54 या काळात श्री. टी. जी. देशमुख यांनी ''मराठी जग'' वृत्तपत्र काढले. 'मराठीजग' फार काळ चालले नाही.परंतु वृत्तपत्र कितीकाळ चालले हयापेक्षा ते कसे चालले हे महत्त्वाचे आहे. 'मराठी जग' अल्पायुषी ठरले असले, तरी ते आपल्या जिवितकाळात खूप गाजले आणि ते गाजण्याचे कारण म्हणजे 'स्वतंत्र विदर्भ राज्याचा पुरस्कार' हे जे त्यांचे ध्येय होते, ते ध्येय आणि झुंजार प्रचार करणारी टी.जी. ची खास बोचरी लेखनशैली हे होते.[2]

श्री. टी. जी. साहेबांना 'स्वतंत्र विदर्भ' पाहिजे होता. त्यामागे त्यांची अनेक कारणे होती. ते म्हणतात विदर्भाचे वेगळे राज्य होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पात्रता विदर्भाला लाभलेल्या आहेत. विदर्भाला प्राचीन, सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, कृषिविषयक, नैसर्गिक साधनसंपत्तीविषयक पार्श्वभूमी लाभलेली आहे. नागपूर हे राजधानीचे शहर व्हावे एवढी नागपूर नगरी संपन्न आहे. विदर्भ राज्याचा उल्लेख इतिहासात आहे, पुराणात आहे तसा महाराष्ट्राचा उल्लेख पुराणात नाही. मध्यप्रदेश व सी.पी. ॲण्ड बेरार प्रातांची राजधानी नागपूर होती. अशी भूमिका स्वतंत्र विदर्भामागे टी.जी. देशमुखांची होती.[3]

पन्नासेक वर्षापूर्वीच्या राजकारणात संयुक्त महाराष्ट्राचे नेते आणि विदर्भाचे नेते यांनी एकत्रित विचारविनिमय करून 8 ऑगस्ट 1947 रोजी ''अकोला करार'' केलेला होता. या करारावर दोनही प्रदेशांच्या प्रमुख नेत्यांनी सहया केल्या होत्या. महाराष्ट्र आणि विदर्भ ही दोन्ही राज्ये वेगळी असावीत, त्यांची विधिमंडळे वेगळी असावीत, राज्यपाल तेवढा एक असावा अशा त्यात अटी होत्या. त्या कराराच्या शेवटी एक प्रतिज्ञापत्र होते. त्या करारावर महाराष्ट्रातर्फे आचार्य शंकरराव देव व विदर्भातर्फे विदर्भ केसरी ब्रिजलाल बियाणी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्या प्रतिज्ञापत्रात असे नमूद करण्यात आले होते की, 'जेव्हा संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याचा प्रश्न येईल. तेव्हा विदर्भातील जनतेचे मत अजमावण्यात येईल.'' पण विदर्भातील जनतेचे मत कधीच घेतले गेले नाही.[4]

अकोला करार आणि त्यात नमूद असलेल्या प्रतिज्ञेचे महाराष्ट्राच्या नेत्यांकडून कधीही पालन झाले नाही. उलट विदर्भाच्या जनतेला फसविण्यासाठी, त्यांची दिशाभूल करण्यासाठी पुढील काळात 'नागपूर करार' या सारखे अनेक प्रकारचे कपट रचल्या गेले. विदर्भाच्या लोकांचे कधीच जनमत घेतले गेले नाही. नंतर तर गोव्या सारख्या छोटया भूविभागाचेही जनमत घेतले गेले. कर्नाटकातील बेळगाव– कारवार या मराठी प्रदेशाला महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी जनमत घेतले गेले. परंतु विदर्भातील जनमत कधीच घेतले गेले नाही. अशा तऱ्हेने मराठी नेत्यांकडून आपल्याच मराठी जनतेच्या लोकशाही हक्काची निर्घृनहत्या झाली असे आपल्याला दिसून येते.[5]

कॉंग्रेस पक्षाने विदर्भाला दिलेली लिखित वचने तोडून मोडून विदर्भाला महाराष्ट्रात समावेश करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा 'स्वतंत्र विदर्भ' च्या निर्मितीसाठी टी. जी. देशमुख व त्यांचे मित्रमंडळी यांनी मिळून 'नागविदर्भ आंदोलन समिती' स्थापन केली. लोकनायक बापूजी अणे, विदर्भ केसरी ब्रिजलाल बियाणी, वीर बाबुराव हरकरे, जनरल आवारी, बाबासाहेब व भाई मुखरे, राजेलालशाम शहा, राजे विश्वेश्वरराव असे अनेक लहाने मोठे भारतीय आंदोलनाचे ख्यातनाम स्वातंत्र्यवीर व अनेक कार्यकर्ते नागविदर्भ आंदोलनात हजारोंच्या संख्येने सामील झाले होते. तत्कालीन कॉंग्रेस नेत्यांनी महाराष्ट्रातील सर्व तुरूंगाचे दर्शन टी. जी. देशमुखांना व त्यांच्या साथीदारांना घडविले.[6]

'स्वतंत्र विदर्भ' ची चळवळ साधारणतः इ.स. 1955 मध्ये झाली. स्वतंत्र विदर्भाचे आंदोलन सुरू होते तेव्हा संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही सुरू होती. संयुक्त महाराष्ट्रामध्ये विदर्भाचा समावेश व्हावा अशी संयुक्त महाराष्ट्राची मागणी होती. त्याला टी.जी. साहेबांनी प्रखर विरोध केला.संयुक्त महाराष्ट्राच्या प्रचारासाठी मुंबई येथे प्र.के. अत्रे यांनी 'मराठा' हे वृत्तपत्र काढले. त्याची शाखा नागपूरला देखील सुरू केली. त्या काळात 'मराठा' हे वृत्तपत्र 'मुलुख मैदान तोफ' समजल्या जात होते. त्यामध्ये भल्या–भल्यांची भंबीरी उडविणारे लेख आचार्य अत्रे लिहित असत. त्यामुळे अत्रेंना सर्वजन वचकून असत. परंतु त्या काळात टी.जी. यांनी 'जयविदर्भ', 'एक आणा' किमतीचे वर्तमान पत्र प्रसिध्द करून आचार्य अत्रेंच्या 'मराठा' वृत्तपत्राला टक्कर देण्याचा प्रयत्न केला. नागपूरमध्ये जामबुवंतराव धोटे, आनंदराव कळमकर, राम हेडाऊ इ. विदर्भवाद्यांच्या मदतीने नागपूर मध्ये सर्वत्र सभा घेण्याचे सत्र सुरू केले. त्याचा परिणाम म्हणून टी. जी. साहेबांच्या नेतृत्वाखाली लाखालाखांचे मोर्चे निघाले. त्यामुळे त्रि. गो. देशमुखांचे नेतृत्व विदर्भात सर्वमान्य होऊ लागले. अशी माहिती एका मुलाखतीत डॉ. बी.आर. आखरे यांनी टी. जी. साहेबांबद्दल दिली.[7]

वेगळ्या विदर्भ राज्यासंबंधी सर्वप्रथम जेहाद 'नाग विदर्भ आंदोलन समिती' ने छेडला. हे आंदोलन उभारण्यासाठी श्री. टी.जी. देशमुख आणि त्यांच्या काही साथीदारांनी 17

ऑक्टों. 1957 रोजी स्थापन केलेल्या नाग विदर्भ आंदोलन समिती ने या लढयाला तीव्र केले आणि वेगळया विदर्भ राज्यासंबंधी जनमत तयार केले. कॉंग्रेस म्हणजे राष्ट्र–राष्ट्र म्हणजे कॉंग्रेस असे समीकरण त्या काळात रूढ होते. कॉंग्रेसशिवाय अन्य कोणत्याही पक्षाचे विशेष अस्तित्व नव्हते. त्यावेळी कॉंग्रेसने स्विकारलेल्या वेगळया विदर्भ राज्याच्या उपेक्षित धोरणाच्या विरोधात विदर्भातील जनतेने 'नागविदर्भ आंदोलन समिती' च्या कार्यकर्त्यांना निवडून दिले. 'नागविदर्भ आंदोलन समिती' च्या आचार्य दांडेकरांनी कॉंग्रेसचे नेते यांनी मदनगोपाल अग्रवाल यांना, लोकनायक बापूजी अणे यांनी रिखबचंद शर्मा यांना तर धोंडबाजी हेडाऊ यांनी राजे प्रतापसिंग भोसले यांना 'स्वतंत्र विदर्भ' राज्याच्या मुद्दयावर पराभूत केले. हा विक्रम, ''न भूतो, नं भविष्यति'' असा होता.[8]

लोकनायक बापूजी अणे, विदर्भ केसरी ब्रिजलाल बियाणी, वीर बाबासाहेब मुखरे, या विदर्भवादी नेत्यांनी विदर्भाचे जनमत वेगळया विदर्भ राज्याच्या बाजूने आहे हे सिध्द करून दाखविले. राजे विश्वेश्वरराव यांनी ''नागविदर्भ आंदोलन समिती'' चे कार्य अखंडपणे या घटकेपर्यंत चालविलेले आहे. परंतु विदर्भात ''नागविदर्भ आंदोलन समिती' अखंडपणे तग धरू शकली नाही. कारण पैसा नव्हता, साधने नव्हती, लोकांपर्यंत पोहचू शकत नव्हती. विरोधात पंडीत जवाहरलाल नेहरू, कन्नमवार, खेडकर, वसंतराव नाईक, यशवंतराव चव्हाण असे आतले आणि बाहेरचे खंदे नेते व तमाम विरोधी पक्ष होते. भरभक्कम पैसा, देशाची सर्व सत्ता याचा एवढा प्रतिकार होता की, काही काळातच लहानमोठयांनी उभारलेली 'नाग विदर्भ आंदोलन समिती' संपून गेली. वीर जामबुवंतराव धोटे यांनी 'महाविदर्भ संघर्ष समिती' द्वारा गावोगाव फिरून 'स्वतंत्र विदर्भा' चा प्रचार केला. सपूर्ण विदर्भ पेटविला परंतु हाही संघर्ष पैशाविना, साधनांच्या अपुरतेने थंड झाला. इंदिरा गांधी सत्ताहिन झाल्यानंतर त्यांच्याकडून तरी विदर्भाचे स्वप्न साकार होईल म्हणून धोटेंच्या फॉरवर्ड ब्लॉकने कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. तेथेही स्वतंत्र विदर्भाचा नारा त्यांनी सोडला नाही, पण कॉंग्रेसच्या राजकीय रगाडयात अनेक प्रश्न उत्पन्न झाले व विदर्भाचा प्रश्न बाजूला पडला.[9]

'स्वतंत्र विदर्भा' च्या चळवळीत टी. जी. देशमुख यांना अपयश आले. नागविदर्भ आंदोलनात त्यांना 104 वेळा अटक करण्यात आली होती. अशी नोंद महानगर पालिकेचे पुस्तक यात करण्यात आली आहे. महाराष्ट्र सरकारने त्यांना स्थानबध्दही केले असले तरी त्यांचे विदर्भाचे 'स्वतंत्र राज्य' असावे हे जे त्यांचे ध्येय होते. ते ध्येय शेवटपर्यंत कायम राहिले. त्यानंतर टी. जी. देशमुख नागपूरचे महापौर इ.स. 1964 मध्ये झाले. आमदार (1980), खासदार, मंत्री आणि विधानपरिषदेचे सदस्यही 1988, 1992या काळातझाले. त्यांची विधान परिषदेतील भाषणे ही सामान्य पातळी वरील नसून लोकशाहीत त्यांना असाधारण महत्व प्राप्त झालेले आहेत. विधानपरिषदेचे सदस्य या नात्याने त्यांनी आपल्या भाषणातून विदर्भाबद्दलची कळकळ, विदर्भ राज्याच्या अनिवार्यतेचे स्पष्ट प्रतिपादन केले आहे. महाराष्ट्राच्या नेतृत्वाची विदर्भाच्या अन्यायाच्या मुद्दयावर कानउघाडणी केली आहे.

अर्धशतक श्री. टी.जी. देखमुख साहेब 'स्वतंत्र विदर्भा' चे राज्य व्हावे म्हणून लढत राहिले,झुंजत राहिले. वेगळया विदर्भासाठी जिवाचे रान करणारे टी. जी. होते. त्यांची निष्ठा ही 'विदर्भ निष्ठा' होती. ती त्यांनी प्राणपणाने शेवटपर्यंत जोपासली. आपल्या हयातीतच ''स्वतंत्रविदर्भा'' चे राज्य होईल असे टी.जी. साहेबांना वाटत होते पण ''स्वतंत्रविदर्भा'' चे राज्य होऊ शकले नाही. परंतु येणाऱ्या नवीन युवा पिढी च्या काळात विदर्भाचे वेगळे राज्य होईल असा आशावाद घेऊनच ते अनंतात विलिन झाले.

## *निष्कर्ष :*

1)श्री. टी. जी.देशमुख साहेबांचा कणखरपणा व मुत्सद्दीपणा दिसून आला.
2)'स्वतंत्रविदर्भ' राज्याचे कट्टर पुरस्कर्ते म्हणून टी.जी. देशमुखांचे नाव विदर्भाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखे आहे.
3)''स्वतंत्रविदर्भ'' आंदोलनाचे जेष्ठ नेते म्हणून त्यांचे नाव घेतले जाणार.
4)वैदर्भीय जनतेचे कैवारी म्हणून टी. जी. देशमुख साहेबांचे नाव घेतले जाईल.

## *संदर्भग्रंथ सूची –*

1)मुलाखत – टी.जी. देशमुख सोबत, दि. 28 / 11 / 2006.
2) देशमुख, टी.जी. 'चौदावे रत्न', संपादक डॉ. द.भि. कुलकर्णी, 26 जाने. 1997, पृष्ठ क्रमांक – 12.
3) मुलाखत – टी. जी. देशमुख सोबत
4) देशमुख, टी.जी. 'चौदाचे रत्न', संपादक डॉ. द.भि. कुलकर्णी, 26 जाने. 1997, पृष्ठ क्रमांक – 32.
5) कित्ता ..................... पृष्ठ क्रमांक – 32.
6) कित्ता ..................... पृष्ठ क्रमांक – 33.
7) मुलाखत – डॉ. बी.आर. आखरे सोबत दि. 17 / 01 / 2008.
8) देशमुख, टी.जी. 'स्वतंत्र विदर्भ', संपादक – डॉ. द.भि. कुलकर्णी, 12 ऑगस्ट 2007, पृष्ठ क्रमांक –72, 73.
9) कित्ता ..................... पृष्ठ क्रमांक – 73.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org